महा मेट्रो

PUNE METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

# (पुणे मेट्रो रेल प्रकल्प )

---

## पुणे मेट्रोच्या लाईन ४ (खडकवासला-हड़पसर-खराड़ी) आणि ४ ए (कर्वेनगर - वारजे - माणिकबाग) प्रकल्पाचे कोथरुडकरांसमोर सादरीकरण; पुढील चार वर्षात प्रकल्प पूर्ण करण्याचा संकल्प.




पुणे - पुणे शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी आणि नागरिकांचा प्रवास सुखकर करण्यासाठी पुणे मेट्रो वेगाने पावले उचलत आहे. याच पार्श्वभूमीवर, पुणे मेट्रोच्या आगामी *लाईन ४ आणि ४ ए (नळस्टॉप - वारजे - माणिकबाग)* या मंजूर मार्गिकांची माहिती स्थानिक नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आज कर्वेनगर येथील महर्षी कर्वे स्त्रीशिक्षण संस्थेच्या इचलकरंजी हॉलमध्ये **'पुणे मेट्रो**

**संवाद'** या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण आणि संसदीय कार्य मंत्री *मा. श्री. चंद्रकांतदादा पाटील* प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक *मा. श्री. श्रावण हर्डीकर (भा.प्र.से.)* आणि संचालक *मा. श्री. अतुल गाडगीळ* यांची विशेष उपस्थिती होती.

**कार्यक्रमातील प्रमुख मुद्दे आणि वैशिष्ट्ये:**



**प्रकल्पाचे सादरीकरण:** महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी पुणे मेट्रोचा विकास, सद्यस्थिती आणि प्रस्तावित लाईन ४ व ४ ए चा सविस्तर आराखडा सादरीकरणाद्वारे मांडला. हा प्रकल्प आगामी चार वर्षांत पूर्ण करण्याचा मेट्रोचा संकल्प असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

मेट्रो ४ आणि ४ ए प्रकल्प पूर्ण झाल्यास कोथरुड, कर्वेनगर आणि वारजे परिसरातील नागरिकांचा वेळ व पैसा वाचण्यासोबतच वाहतूक कोंडीतून मोठी सुटका होईल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला. एसएनडीटी मेट्रो स्थानक येथून कोथरुडमध्ये सुरू असलेल्या शटल बस सेवा आणि प्रीपेड रिक्षा सुविधेचे श्रावण हर्डीकर यांनी कौतुक करत, नागरिकांना घरापर्यंत कनेक्टिव्हिटी देण्याला मेट्रो प्राधान्य असल्याचे स्पष्ट केले. पीएमपीएमल बरोबर समन्वय साधून लवकरच नवीन बस ताफ्यात घेण्यात येणार आहेत आणि त्याचा वापर जास्तीत जास्त मेट्रो फिडर म्हणून करावा यासाठी हालचाली सुरू आहेत हे नागरिकांना सांगितले. त्याचबरोबर मेट्रो मार्गावर 'ट्रांझिट ओरिएंटेड डेवलोपमेन्ट' (TOD) चा योग्य वापर करुन मेट्रोच्या पायाभूत सुविधेचा अधिक क्षमतेने वापर कसा करता येईल याचे मार्गदर्शन केले. सर्व उपलब्ध सार्वजनिक वहतुकीच्या साधनांचे एकात्मिक नियोजन केल्याने प्रवाश्यांना बस, रिक्षा आणि मेट्रो यांची सुरळीत सेवा मिळण्यासाठी मदत होणार आहे. यामुळे लोकसंख्येच्या दृष्टीने घनतेने अधिक असणाऱ्या भागांना परिवहन व्यवस्था उपयुक्त ठरेल.

या कार्यक्रमात कोथरूड, कर्वेनगर, सिंहगड रोड परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रकल्पाबाबत आपल्या शंका विचारल्या, ज्यांचे महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी सविस्तर निरसन केले.

"२०१६ मध्ये जेव्हा मेट्रो प्रकल्प पुण्यात आला, तेव्हा अनेकांना ते दिवास्वप्न वाटत होते. मात्र, आज मेट्रो पुणेकरांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनली आहे," असे गौरवोद्गार ना. पाटील यांनी काढले. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भरीव आर्थिक पाठबळामुळेच मेट्रोचे टप्पे वेळेत पूर्ण होत असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी महामेट्रो चे व्यवस्थापकीय संचालक म्हणाले की, "पुण्यासारख्या शहरासाठी, भविष्यातील

गतिशीलता केवळ पायाभूत सुविधांवर अवलंबून नाही, तर ती मानसिकतेतील बदलावर अवलंबून आहे. नागरिकांनी चालणे आणि सार्वजनिक वाहतुकीचा वापर आपली जीवनशैली म्हणून स्वीकारणे आवश्यक आहे. पुणे मेट्रो म्हणजे केवळ वेग नव्हे, तर तो एक असा सातत्यपूर्ण, विश्वासार्ह आणि शाश्वत वाहतुकीचा पर्याय आहे, ज्यावर लोक दररोज अवलंबून राहू शकतात."

याप्रसंगी माजी नगरसेवक राजाभाऊ बराटे, पुनीत जोशी, सुशील मेंगडे, शिवरामपंत मेंगडे, माजी नगरसेविका मंजुषा खर्डेकर, रेश्मा बराटे, तेजश्री पवळे यांच्यासह महापालिका आणि मेट्रोचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पुणे मेट्रोच्या या संवाद उपक्रमामुळे प्रकल्पाबाबत पारदर्शकता निर्माण होऊन स्थानिक नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

